N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल
(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. District (जिल्हा): अकोला P.S. (पोलीस ठाणे): सिव्हील लाईन Year (वर्ष): 2026

FIR No. (प्रथम खबर क्र.): 0485 Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 04/06/2026 15:01 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):

1 Day (दिवस): गुरूवार Date from (दिनांक पासून): 09/04/2026 Date To (दिनांक पर्यंत): 09/04/2026

Time Period (कालावधी): प्रहर ५ Time From (वेळेपासून): 13:04 तास Time To (वेळेपर्यंत): 13:26 तास

(b) Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा): Date (दिनांक): 04/06/2026 Time (वेळ): 14:46 तास

(c) General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ): Entry No. (नोंद क्र.): 037 Date and Time (दिनांक आणि वेळ): 04/06/2026 14:46 तास

4. Type of Information (माहितीचा प्रकार): लेखी

5. Place of Occurrence (घटनास्थळ):

1. (a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर): उत्तर, 2 कि.मी. Beat No. (बीट क्र.):

(b) Address (पत्ता): मुख्य बस स्टॅण्डजवळ असलेल्या,सदाबहार हॉटेल, अकोला

(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):

District (State) (जिल्हा (राज्य)): (महाराष्ट्र)

6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):

(a) Name (नाव): पाेनि अतुल गुणवंतराव इंगोले

(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):

(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष): 1982

(d) Nationality (राष्ट्रीयत्व):भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No. (पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख ): Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) Occupation (व्यवसाय):

(i) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोल, सिव्हील लाईन, अकोला, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोल, सिव्हील लाईन, अकोला, महाराष्ट्र, भारत |

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल क्र.): 91-8888757550

7. Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):

Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या): 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | सौ. वनमाला कैलास वाघ | | | 1. Town/Village (शहर / गाव): चिंचोली गणू,ता बाळापूर जि,Tehsil (तहसील): अकोला,Police Station (पोलीस ठाणे): सिव्हील लाईन,District (जिल्हा): अकोला,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | कैलास डिगांबर वाघ | | | 1. Town/Village (शहर / गाव): चिंचोली गणू,ता बाळापूर जि,Tehsil (तहसील): अकोला,Police Station (पोलीस ठाणे): सिव्हील लाईन,District (जिल्हा): अकोला,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

10. Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :

11. Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

मी अतुल गुणवंतराव इंगोले, वय 44 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला शासनातर्फे फिर्याद देतो की, दिनांक 09.04.2026 रोजी तक्रारदार श्री. रितेश सुभाष अंभोरे, वय 21 वर्ष, शिक्षण- १२ वी, व्यवसाय-सचिव, अथांग बहुउद्देशि संस्था, चिंचोली गणू, ता. बाळापूर जि. अकोला हे एका लोकसेवकाविरूध्द तक्रार देण्याकरीता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला येथे समक्ष हजर आले. त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री. रितेश सुभाष अंभोरे यांना त्यांचे तक्रारी बाबत प्रथम सविस्तर विचारपूस केली. त्यांना त्यांची तक्रार स्वहस्ताक्षरात लिहून देण्यास सांगितले असता त्यांनी त्यांची तोंडी तक्रार नोंदवून घेण्याची विनंती केली. आम्ही एका गोपनिय कामाकरीता मा. तहलिसदार, तहसिल कार्यालय, अकोला यांना या कार्यालयाचे पत्र क्र. 462/2026 दिनांक 07.04/2026 अन्वये दिले होते. त्यावरून त्यांनी त्यांचे कार्यालयातील 1) श्री. हरिष जिवन कल्याणकर, पद-महसुल सेवक व 2) श्री. कुणाल शिरसाट, पद-महसुल सेवक यांना या कार्यालयात पाठविले होते. नमुद दोन्ही पंच यावेळी कार्यालयात हजर होते. नमुद दोन्ही पंचांना सदर कार्यवाहीमध्ये पंच म्हणुन हजर राहण्याबाबत संमती विचारली असता, त्यांनी सदर कार्यवाहीत पंच म्हणून काम करण्याची संमती दिली. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना तक्रारदार यांचे तक्रारीबाबत त्यांना तोंडी विचारपूस करण्यास सांगीतले. त्यावरून दोन्ही पंचांनी तक्रारदारास विचारणा केली. त्यानंतर दोन्ही पंचासमक्ष तक्रारदार श्री. रितेश सुभाष अंभोरे यांची तोंडी तक्रार कार्यालयीन लॅपटॉपवर टंकलिखीत करण्यात आली. सदर टंकलिखित तक्रारीची प्रिंट आऊट काढून त्या तक्रारीवर तक्रारदार श्री. रितेश सुभाष अंभोरे यांनी स्वाक्षरी केली. तक्रारदार श्री. रितेश सुभाष अंभोरे यांनी नोंदविलेली तक्रार व त्यांचेकडे तक्रारीसंबंधी तोंडी विचारपुस केलेला मजकुर सारखाच असल्याची आमची व दोन्ही पंचांची खात्री झाल्यानंतर सदर तक्रारीवर आम्ही व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. तक्रारदार श्री. रितेश सुभाष अंभोरे यांनी नोंदविलेल्या तक्रारीतील मजकुर खालीलप्रमाणे आहे.मी आज दिनांक 09.04.2026 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला येथे श्री. आशिष धर्मपाल सिरसाट, अध्यक्ष, अथांग बहुउद्देशीय संस्था, चिंचोली गणू, ता. बाळापूर जि. अकोला यांचेसह समक्ष हजर येवुन तक्रार देतो की, मी वर नमुद पत्यावर राहत असुन अथांग बहुउद्देशीय संस्था, चिंचोली गणू, ता. बाळापूर जि. अकोला मध्ये सचिव या पदावर कामकाज करतो. सन 2024-2025 मध्ये शासनाच्या १५ वित्त आयोग या योजनेअंतर्गत ग्राम पंचायत चिंचोली गणू, ता. बाळापूर जि. अकोला येथील महिलांना तिन दिवसाचे शिवणकामाचे प्रशिक्षण देण्याबाबत 'अथांग बहुउद्देशि संस्था, चिंचोली गणू, ता. बाळापूर जि. अकोला या संस्थेस ग्रामपंचायत चिंचोली गणू यांचेकडुन कार्यरंभ आदेश मिळाला होता. सदर आदेशामध्ये नमुद प्रशिक्षण देण्याकरीता करण्यात आलेल्या खर्चाची तरतुद रू. 66,700/-करण्यात आली होती. त्यानुसार 'अथांग बहुउ द्देशि संस्था, चिंचोली गणू, ता. बाळापूर जि. अकोला या संस्थेच्या वतीने मी व श्री. आशिष धर्मपाल सिरसाट, अध्यक्ष तसेच आमचे सहकारी यांनी ग्रामपंचायत चिंचोली गणू येथे दिनांक 05.06.2025 ते दिनांक 07.06.2025 या कालावधीत तिन दिवशीय शिवणकामाचे प्रशिक्षण आयोजीत करून महिलांना शिवणकामाबाबत प्रशिक्षण देण्यात आलेले आहे त्यानंतर माहे डिसेंबर 2025 मध्ये आम्ही नमुद प्रशिक्षाणचे रू. 66,700/- चे देयक मिळणे करीता ग्रामपंचायत चिंचोली गणू येथील ग्रामसेवक श्री. सुनिल इंगळे यांचेकडे देयके सादर

केली होती. त्यावेळी सरपंच सौ. वनमाला कैलास वाघ यांनी मला सांगीतले की, सदर कामाचे देयक देते वेळी ग्रामसेवक व सरपंच यांचे दोघांच्याही संयुक्त डिजीटल सहीनिशी देयके देण्यात येतात. तुम्ही मला सदर कामाचे ४६,०००/- रूपये दिल्याशिवाय तुम्हाला देयके मिळणार नाहीत. त्यावर मी त्यांना नाईलाजास्तव ठिक आहे असे बोलून तिथून निघून आलो. त्यानुसार दिनांक 22.01.2026 रोजी 'अथांग बहुउद्देशि संस्था, चिंचोली गणू, ता. बाळापूर जि. अकोला यांचे सेंट्रल बँक ऑफ इंडीया शाखा वाडेगांव येथील खाते क्र. 5778072655 मध्ये जमा झालेली आहे. त्यानंतर सौ. वनमाला कैलास वाघ, सरपंच यांनी मला वारंवार फोन करून देयक काढून देण्याचा मोबदला म्हणुन पैश्याची मागणी करीत आहेत. त्यानंतर दिनांक 09.02.2026 रोजी ग्रामपंचायत चिंचोली गणू येथील सरपंच व उपसरपंच पदाचा कार्यकाळ पुर्ण झाल्याने मा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, बाळापूर जि. अकोला यांच्या दिनांक 04.03.2026 रोजीच्या आदेशान्वये सौ. वनमाला कैलास वाघ यांची प्रशासक म्हणुन निवड झालेली असुन सध्या ते प्रशासक या पदावर ग्रामपंचायत चिंचोली गणू येथे कार्यरत आहेत.गैरअर्जदार सौ. वनमाला कैलास वाघ, तत्कालीन सरपंच, तथा सध्या कार्यरत प्रशासक, ग्रामपंचायत चिंचोली गणू ता. बाळापूर जि. अकोला यांनी ग्रामपंचायत चिंचोली गणू, ता. बाळापूर जि. अकोला येथे 'अथांग बहुउद्देशि संस्था, चिंचोली गणू, ता. बाळापूर जि. अकोला या संस्थेव्दारे महिलांना शिवणकामाचे प्रशिक्षण दिल्याचे देयक काढून दिल्याचा मोबदला म्हणुन माझेकडे मागणी केलेली लाच रक्कम रू. 46,000/- त्यांना देण्याची माझी मुळीच इच्छा नसल्याने मी त्यांचे विरूध्द कायदेशिर कार्यवाही करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे. माझी त्यांचेशी कोणत्याही प्रकारची देवाण-घेवाण अथवा वैमनस्य नाही."तक्रारदार श्री. रितेश सुभाष अंभोरे यांनी नोंदविलेल्या तक्रारी नुसार गैरअर्जदार सौ. वनमाला कैलास वाघ, तत्कालीन सरपंच, तथा सध्या कार्यरत प्रशासक, ग्रामपंचायत चिंचोली गणू ता. बाळापूर जि. अकोला यांची तक्रारदाराकडे खरोखरच लाचेची मागणी आहे काय? याबाबत पंचाचे उपस्थितीत कार्यालयीन व्हॉईस रेकार्डरव्दारे लाच मागणीची पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले.त्यानंतर दिनांक 09.04.2026 चे 13.04 वा. ते 13.26 वा. दरम्यान गैरअर्जदार सौ. वनमाला कैलास वाघ, तत्कालीन सरपंच, तथा सध्या कार्यरत प्रशासक, ग्रामपंचायत चिंचोली गणू ता. बाळापूर जि. अकोला यांची तक्रारदार श्री. रितेश सुभाष अंभोरे यांच्याकडे असलेल्या लाच मागणीची पडताळणी मुख्य बस स्टॅण्डजवळ असलेल्या सदाबहार हॉटेल, अकोला ता.जि. अकोला येथे करण्यात आली.सदर लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान गैरअर्जदार सौ. वनमाला कैलास वाघ, तत्कालीन सरपंच, तथा सध्या कार्यरत प्रशासक, ग्रामपंचायत चिंचोली गणू ता. बाळापूर जि. अकोला यांनी तक्रारदार श्री. रितेश सुभाष अंभोरे यांच्याकडे रू. 46,000/- लाच रकमेची मागणी करून तडजोडीअंती रू. 20,000/- लाच रकमेची मागणी करून स्विकारण्याची तयारी दर्शविली तसेच श्री. कैलास डिगांबर वाघ (सरपंच पती) यांनी सदर लाच रकमेच्या व्यवहारामध्ये तडजोड करून सदर लाच मागणीस प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले.सदर लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान श्री. सुनिल इंगळे, ग्रामसेवक, ग्रामपंचायत चिंचोली गणू ता. बाळापूर जि. अकोला यांना सुध्दा पैसे द्यावे लागतात, अश्या प्रकारची बोलणी झाल्याने श्री. सुनिल इंगळे, ग्रामसेवक यांची तक्रारदाराकडे खरोखरच लाचेची मागणी आहे किंवा कसे? याबाबत लाच पडताळणी करण्याचे ठरविण्यात आले.त्यानंतर दिनांक09.04.2026चे 17.35 वा. ते 18.01 वा. दरम्यान एस.टी. वर्क शॉप कौलखेड, अकोला येथे श्री. सुनिल इंगळे, ग्रामसेवक, ग्रामपंचायत चिंचोली गणू ता. बाळापूर जि.

अकोला यांच्या लाच मागणीबाबत पडताळणी करण्यात आली. सदर लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान श्री. सुनिल इंगळे, ग्रामसेवक, ग्रामपंचायत चिंचोली गणू ता. बाळापूर जि. अकोला यांनी तक्रारदार श्री. रितेश सुभाष अंभोरे यांच्याकडे कुठल्याही प्रकारची लाच रकमेची मागणी केली नाही. त्यावरून गैरअर्जदार सौ. वनमाला वाघ यांचेविरूध्दची पुढील सापळा कार्यवाही दिनांक 11.04.2026 रोजी करण्याचे ठरविण्यात आले. दिनांक 09.04.2026रोजी केलेल्या कार्यवाहीच्या सविस्तर नोंदी पंचनामा क्र. 1 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.त्यानंतर दिनांक 11.04.2026 चे 13.55 वा. ते 14.12 वा. दरम्यान ग्राम चिंचोली गणू ता. बाळापूर जि. अकोला येथे गैरअर्जदार सौ. वनमाला कैलास वाघ यांचे राहते घरी सापळा रचण्यात आला. सदर सापळा कार्यवाही दरम्यान गैरअर्जदार सौ. वनमाला वाघ हे घरी हजर मिळून आले नाही. त्यावेळी घरी हजर असलेले गैरअर्जदार यांचे पती कैलास वाघ यांनी आशिष भाउ ले काउन नाही आणलं असे म्हटल्याने तक्रारदार श्री रितेश अंभोरे हे परत आले. त्यामुळे गैरअर्जदार यांनी तक्रारदाराकडे मागणी केलेली लाच रक्कम आणून देण्याबाबत किंवा लाच रकमेसंबंधात गैरअर्जदार यांच्याकडुन काही निरोप मिळाल्यानंतर गैरअर्जदार यांचे विरूध्द पुढील कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. दिनांक 11.04.2026 रोजी करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या सविस्तर नोंदी, पंचनामा क्र. 2 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.त्यानंतर दिनांक 23.04.2026 रोजी सकाळी 08.50 वा. दरम्यान तक्रारदार रितेश सुभाष अंभोरे यांनी आम्हास त्यांचा मोबाईल क्रमांक 9923851154 वरून फोन करून सांगीतले की, "गैरअर्जदार सौ. वनमाला वाघ हिने काल दिनांक 22.04.2026रोजी सायंकाळी त्यांचे मोठे बाबा श्री. गुलाब अंभोरे व त्यांचा चुलत भाऊ श्री. शुध्दोधन अंभोरे यांना सांगीतले की, "रितेश ले सांग आमचे पैसे आणुन दे" असे म्हटले. त्यामुळे आज रोजी गैरअर्जदार यांचे विरूध्द पुढील कार्यवाही करावी. त्यावरून आम्ही तक्रारदार रितेश सुभाष अंभोरे यांना आज दिनांक 23.04.2026 रोजी 16.00 वा. दरम्यान वाडेगांव पुर्वी असलेल्या गोपनिय ठिकाणी हजर राहण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर दिनांक 23.04.2026 चे 17.23 वा. ते 18.44 वा. दरम्यान ग्राम चिंचोली गणू ता. बाळापूर जि. अकोला येथे गैरअर्जदार सौ. वनमाला कैलास वाघ यांचे राहते घरी सापळा रचण्यात आला. सदर सापळा कार्यवाही दरम्यान गैरअर्जदार सौ. वनमाला वाघ यांनी तक्रारदाराचा चुलत भाउ शुध्दोधन अंभोरे व मोठे बाबा श्री. गुलाब अंभोरे यांना गैरअर्जदार यांचे घरी बोलावून घेतले. त्यानंतर गैरअर्जदार यांनी तक्रारदार श्री. रितेश अंभोरे व पंच क्र. 1 श्री. हरिष कल्याणकर यांचा मोबाईल ताब्यात घेतला. त्यानंतर गैरअर्जदार सौ. वनमाला वाघ यांनी तक्रारदाराकडे मागणी केलेली लाच रक्कम 20,000/- तक्रारदाराचा चुलत भाउ श्री. शुध्दोधन अंभोरे यांचेकडे देण्यास सांगितले. परंतू श्री. शुध्दोधन अंभोरे व तक्रारदाराचे मोठे बाबा श्री. गुलाब अंभोरे यांना तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीबाबत काहीही माहिती नसल्यामुळे तक्रारदाराने त्यांचेकडे लाच रक्कम देण्यास नकार दिला. त्यामुळे गैरअर्जदार सौ. वनमाला वाघ यांना शंका निर्माण झाल्याने त्यांनी तक्रारदार श्री रितेश अंभोरे यांचेकडे मागणी केलेली लाच रक्कम स्विकारली नाही.UF -तक्रारदार श्री रितेश अंभोरे यांनी आम्हास दोन्ही पंचासमक्ष सांगीतले की, गैरअर्जदार सौ. वनमाला वाघ यांनी त्यांचेकडे मागणी लाच रक्कम स्विकारण्याची शक्यता आहे. त्यामुळे गैरअर्जदार यांनी लाच रक्कम आणून देण्याबाबत किंवा लाच रकमेसंबंधात मला काही निरोप दिल्यानंतर पुढील कार्यवाही करावी. दिनांक 23.04.2026 रोजी करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या सविस्तर नोंदी, पंचनामा क्र. ३ मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.त्यानंतर दिनांक

03.06.2026 रोजी तक्रारदार श्री रितेश अंभोरे यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला कार्यालयात हजर येवून दोन्ही पंचासमक्ष सांगीतले की, गैरअर्जदार सौ. वनमाला वाघ व त्यांचे पती श्री. कैलास वाघ यांना माझे हालचालीवर संशय निर्माण झाल्याने त्यांनी तक्रारदाराकडे मागणी केलेली लाच रक्कम ते आता स्विकारणार नाहीत याची त्यांना खात्री झाली आहे. त्यामुळे गैरअर्जदार सौ. वनमाला कैलास वाघ, तत्कालीन सरपंच, तथा सध्या कार्यरत प्रशासक, ग्रामपंचायत चिंचोली गणू ता. बाळापूर जि. अकोला व त्यांचे पती श्री. कैलास वाघ यांचेविरूध्दची पुढील कार्यवाही थांबविण्यात यावी. दिनांक 03.06.2026 रोजी करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या सविस्तर नोंदी, पंचनामा क्र. 4 मध्ये घेण्यात आलेल्या आहेत.एकंदरीत दिनांक 09.04.2026 चे 13.04 वा. ते 13.26 वा. दरम्यान मुख्य बस स्टॅण्डजवळ असलेल्या सदाबहार हॉटेल, अकोला ता.जि. अकोला येथे गैरअर्जदार सौ. वनमाला कैलास वाघ, वय 38 वर्ष, पद-तत्कालीन सरपंच, तथा प्रशासक, ग्रामपंचायत चिंचोली गणू ता. बाळापूर जि. अकोला यांची तक्रारदार श्री. रितेश सुभाष अंभोरे यांच्याकडे रू.46,000/- लाच रकमेची मागणी करून तडजोडीअंती रू. 20,000/- लाच रकमेची मागणी करून ती लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली तसेच श्री. कैलास डिगांबर वाघ (सरपंच पती) वय 46 वर्ष, व्यवसाय शेती, रा. चिंचोली गणू ता. बाळापूर जि. अकोला यांनी सदर लाच मागणीस प्रोत्साहन दिल्याने त्यांचे हे कृत्य कलम 7,12 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 अन्वये गुन्हा होत असल्याने माझी त्यांचे विरूध्द शासनातर्फे कायदेशीर फिर्याद आहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Malti Motilal Kayte (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा): on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)

R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)

Registered by (नोंदणी अधिकारी)
Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): Malti Motilal Kayte

Rank (हुद्दा): I (Inspector)

No. (क्र.):

14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):